ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 10 | November - 2016

Indian Streams Research Journal

# पाश्चिमात्यीकरण व आधुनिकीकरणाचा तरुणांच्या लैंगिकतेवरील प्रभाव

प्रदीप आर. भानसे
एस.एस.जे. कॉलेज अर्जुनी/मोर. जि. गोंदिया.

**सारांश:**
पाश्चिमात्यीकरण व आधुनिकीकरण ही परिवर्तन घडवुन आणणारी गतिशील अशी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेने सामाजिक, आर्थिक, धार्मिक व वैचारिक क्षेत्रांमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले आहे. त्यामुळे समाज व व्यक्ती दोन्ही गतिशील बनले आहे. आधुनिकीकरण व पाश्चिमात्यीकरणाचा परिणाम तरूण पिढीवर अधिक पडलेला दिसतो आहे. व्यक्ती स्वातंत्र्याचा अतिरेक व स्वैरवृत्तीने विचार करण्याची प्रवृत्ती तरुणांमध्ये दिसत आहे. चित्रपट व दूरदर्शनच्या प्रभाव तरुणांवर अधिक आहे. त्यातील दृश्यांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती सातत्याने वाढत आहे. तरुणांच्या हातात स्मार्टफोन आल्यामुळे संपूर्ण विश्व हे त्यांच्यासाठी ठेंगणे झाले आहे. तारुण्यात पदार्पण केलेल्या युवकांवर याचे अतिशय तीव्र परिणाम दिसून येत आहे. कश्राव्य साधनांमध्ये दाखविल्या जाणाऱ्या दृश्यांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती दिसत असून लैंगिक संबंधाच्या बाबतीत त्यांचात अधिक सैल विचार करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. आधुनिकीकरण व पाश्चिमात्यीकारणाच्या प्रभावाने तरुण पीढी लैंगिकतेच्या संदर्भात कसा विचार वा वर्तन करण्याची प्रवृत्ती दिसते हे प्रस्तुत पेपरच्या माध्यमातून जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**कळीचे शब्द** : लैंगिकता, लैंगिक शिक्षण.



**प्रस्तावना:**
"आधुनिकीकरण म्हणजे विशिष्ट सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी गतिमान आणि सर्वस्पर्शी अशी सातत्याने चालू असलेली एक प्रक्रिया होय. अमेरिका, इंग्लंड, जापान, जर्मनी, फ्रांस, इ. विकसित राष्ट्रांमध्ये प्रकर्षाने दिसून येणारी आणि अविकसित व विकसनशील राष्ट्रांना आदर्शवत ठरलेली प्रक्रिया म्हणजे आधुनिकीकरणाची प्रक्रिया असे सामान्यपणे समजले जाते. त्यामुळे विकसित राष्ट्रातील समाजात घडलेली व सध्या घडत असलेली स्थित्यंतरे ही आधुनिकीकरणाची प्रमाणभूत लक्षणे मानली जातात."[1] अठराव्या शतकात इंग्लंड, फ्रांस, जर्मनी, हॉलंड इ. युरोपीय राष्ट्रांतही सुरु झालेली प्रक्रिया, या राष्ट्रांची

साम्राज्ये आशिया व आफ्रिका या देशात असल्यामुळे साहजिकच अविकसित देशात सत्ताधारी समाज हा आदर्श समजला जात असे आणि त्यांच्या आचार-विचारांच्या अनेक वैशिष्ट्यांचे अनुकरण चालू असे या अनुकरणाला पूर्वी आंग्लीकरण किंवा पश्चिमीकरण असे म्हटले जाई. म्हणजे "अविकसित देशाच्या संदर्भात आधुनिकीकरण हे एका जुन्या प्रक्रियेला दिलेले नवे नाव आहे."[2] आधुनिकीकरणाची प्रक्रिया ही एकाच वेळी सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय व वैचारिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये चालू असते. संस्कृती, समाजव्यवस्था आणि व्यक्ती यांच्या परिवर्तनाच्या संदर्भात कमी-अधिक तीव्रतेने ती कार्यप्रवण असते. समाजातील या सर्व क्षेत्रातील घटक हे परस्परसंलग्न व परस्परावलंबित असल्यामुळे एकमेकांवर सतत प्रभाव पाडत असतात.

झपाट्याने होत असलेल्या सामाजिक परिवर्तनास अनुसरून जुन्या आचारविचारांच्या जागी नवे आचार-विचारही रुजू लागले. यांत्रिकीकरणामुळे व व्यापक औद्योगीककरणामुळे श्रमविभागणीचा पायाच बदलला. व्यक्तीच्या व्यावसायिक वा तांत्रिक प्रशिक्षणावरुन अगर कौशल्यावरून तिचे सामाजिक स्थान निश्चित झाले. समाज व व्यक्ती दोन्हीही गतिशील बनली. त्यामुळे सामाजिक संबंधही बदलले. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला ही सर्व परिस्थिती जबाबदार असल्याने अमुकच एक गोष्ट तिचे मुलभूत कारण आहे, असे ठामपणे म्हणता येत नाही.

समाजातील सर्वसामान्य माणसाला सहजगत्या उपलब्ध असणारी ऐहिक सुखोपयोगाची साधने हे आधुनिकीकरणाचे महत्त्वाचे गमक आहे. हे जरी खरे असले तरी आधुनिक समाज हा सर्व दृष्टींनी परिपूर्ण असेल आणि त्यात कोणत्याही समस्या नसतील असे समजणे मात्र चुकीचे होईल.

आधुनिकीकरण व पाश्चिमात्यीकरणाचा प्रभाव तरुण पिढीवर विशेषत: अधिक पडलेला दिसतो. कुटुंब संस्थेचे वर्चस्व नष्ट होऊन विवाह विच्छेदनाच्या वाढत्या प्रमाणामुळे कुटुंबसंस्था अस्थिर बनत चाललेली आहे. कौटुंबिक अस्थिरतेमुळे मुलांच्या सामजिकरणावर प्रभाव पडून त्यांच्यावरील नियंत्रण दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे औपचारिक समुहांचा व नियमांचा प्रादुर्भाव व त्यामुळे निर्माण झालेला व्यक्ती व समाज यातील दुरावा यासारखे प्रश्नही गुंतागुंतीचे होत चालले आहे व्यक्ती स्वातंत्र्याच्या अतिरेकाने तरुणांमध्ये समाजविघातक अशी स्वैरवृत्ती वाढत आहे. कलेच्या नावाखाली अनैतिक व समाजविघातक प्रवृतींना बाजारू प्रोत्साहन मिळत असल्यामुळे याचा प्रत्यक्ष परिणाम तरुणांवर होत आहे. चित्रपट व दूरदर्शनवर दाखविल्या जाणाऱ्या केशभूषा, वेशभूषा व जीवनरीतीचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती तरुणांमध्ये वाढू लागली आहे. दूरसंचार क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे संपूर्ण जग हे एक छोटे खेडे झाले आहे तरुणांच्या हातात स्मार्टफोन आल्यामुळे याचा सर्वाधिक परिणाम त्यांच्या वर्तनावर पडलेला आहे. तारुण्यात पदार्पण केलेल्या युवकांवर तर याचे अतिशय तिव्र परिणाम दिसून येत आहे. टी. व्ही. मध्ये दाखविल्या जाणाऱ्या दृश्यांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती तरुणांमध्ये दिसत असून लैंगिक संबंधाच्या बाबतीत त्यांच्यात अधिक सैल विचार प्रवृत्ती वाढत चालली आहे.

पाश्चिमात्यीकरण व आधुनिकीकरणाच्या प्रभावातून हीच प्रवृत्ती भारतासारख्या विकसनशील देशामध्ये सुद्धा दिसू लागली आहे. सामाजस्वास्थाच्या दृष्टिने याची गणना सामाजिक समस्येमध्ये करता येते.

## संशोधनाची उद्दिष्टे:

1) युवकांची लैंगिक्तेच्या संदर्भात असणारी मानसिकता तपासणे.
2) पाश्चिमात्यीकरण व आधुनिकीकरणाच्या संदर्भात तरुणांच्या लैंगिक वर्तणुकीचा अभ्यास करणे.

**तथ्य संकलनाची पध्दती :**

1) **प्रस्तुत संशोधनात प्राथमिक तथ्य संकलनासाठी** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून **अनुसूची भरून घेण्यात आल्या.**

2) द्वितियक **तथ्य संकलनात प्रकाशित व अप्रकाशित लिखित प्रलेखाचा यामध्ये अंतर्भाव करण्यात आला.**

**पाश्चिमात्यीकरण व आधुनिकीकरणाचा तरुणांवरील लैंगिकतेच्या प्रभावाचे विश्लेषण करण्यासाठी एकूण** 13 **बाबींचे एक अनुमाप तयार करण्यात आले. त्यामध्ये विवाहपूर्व लैंगिक संबंध प्रस्थापित करणे सहज चालण्यासारखे आहे काय किंवा** महाविद्यालयात **शिकणारे** विद्यार्थी **विवाहपूर्व लैंगिक संबंधाबाबत कसा विचार करतात**, **या प्रश्नाला** 69.7% **उत्तरदाते विवाहपूर्व लैंगिक संबंध प्रस्थापित करणे सहज चालण्यासारखे नाही असे म्हणतात. असे असले तरी** विद्यार्थी **उत्तरदात्यांपैकी** 27.1% विद्यार्थी **व** 9.9**%** विद्यार्थिनी **उत्तरदाते विवाहपूर्व लैंगिक संबंध प्रस्थापित करणे सहज चालण्यासारखे आहे असा विचार करतात. मात्र तरुणांना संभोगविषयक अज्ञान असल्यामुळे आज जगात तीन कोटी कुमारीमाता असल्याचे दिसून येते** 1980 **नंतर एक कोटी अमेरिकनांना हर्प्स व एड्स या रोगाची लागण झाली आहे. बाहेरख्यालीपनाबद्दल आणि लैंगिक दुराचाराबद्दल शिक्षा म्हणजे हे दुर्धर जीवघेणे रोग होय. ऑस्ट्रेलियातील एका संशोधनानुसार** **“**Adolescent are having sex at a younger age, more often and with more partners. More than half of young Australians are sexually active by 16. Sexually Transmitted Diseases among 15-19 Years-old are rising.” [3] (Sawant Anagha) महाविद्यालयीन **जीवनात युवक-युवतींमध्ये मित्र-मैत्रिण किंवा प्रियकर-प्रेयसी या नात्याने एकमेकांच्या जवळ येण्याच्या संधी व प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. अमेरिकेत ज्याप्रमाणे वयात आल्याबरोबर मुले-मुली एकमेकांबरोबर फेरफटका मारणे, जेवण करणे, गप्पाटप्पा, थोडीफार शारीरिक लगट, चुंबन, आलिंगन, डेटिंगला,** विकेंडला **जाण्याची पद्धती आहे. त्याचप्रमाणे भारतातही काही प्रमाणात युवक-युवतीं मध्ये असे प्रकार दिसायला लागले आहे. त्यामुळे युवक-युवतींना अशा जवळ येण्याचा लैंगिकतेशी संबंध आहे काय? हे जाणून घेण्यासाठी एकमेकांना स्पर्श करणे, चिकटून बसने, खेटून चालणे, हातात हात घालणे, एकमेकांच्या** गळ्यात **पडणे यांचा लैंगिकतेशी संबंध नाही असे** 59.7**%** **उत्तरदाते म्हणतात. यामध्ये** विद्यार्थी **उत्तरदात्यांचे प्रमाण** 56.6**%** **तर** विद्यार्थीनी **उत्तरदात्यांचे** 62.0**%** **आहे.**

**भारतीय संस्कृतीचा विचार करता लैंगिक संबंध लग्नानंतरचीच घटना आहे. कारण लैंगिक संबंध स्थापन करण्यासाठी विवाहसंस्थेची मान्यता आवश्यक आहे. हे खरे असले तरी दोन व्यक्तींनी परस्पर संमतीने शरीरसुख घेण्यात समाजविरोधी काहीच नाही अशी पाश्चात्य देशात असलेली विचारसरणी भारतात पाश्चिमात्तीकरणातून हळूहळू रुजू पाहत आहे लैंगिक संबंध हा क्षणाचा खेळ असला तरी त्यातून उदभवणारी बंधने, अपेक्षा दिर्घतर असतात. मुलांमुलींना दिले जाणारे एकत्र शिक्षण, खेळ, स्पर्धा, सततचा संपर्क, तारुण्यसुलभ भावना यामुळे युवक-युवतीं मध्ये मैत्री व प्रेमाची भावना रुजू पाहत आहे. लग्नाचे वय** कायद्याने **वाढल्यामुळे विवाहपूर्व जीवनात प्रेम नैसर्गिक गरज बनली आहे. स्वत:चा जोडीदार स्वतः निवडण्याच्या प्रयत्नातून, संसाराच्या** रोमँटिक **कल्पनेतून तरूण-तरुणी एकत्र येत आहेत. तारुण्यातील अस्वस्थता, देहात व मनात झालेला बदल, भोवतालचे सहिष्णू वातावरण व लैला-मजनूच्या रंगीन दुनियेची साद यामुळे मुलेमुली एकमेकांकडे आकर्षिले जात आहे. श्रीकृष्ण क्षिरसागर यांचे मते “विवाहपूर्व लैंगिक संबंध प्रस्थापित करणे हे अनैतिक आहे. या** दृष्टिकोणातून **पाहण्यापेक्षा एक मनोरंजक घटना म्हणून पाहण्याची समाजाची प्रवृत्ती दिसते आहे.”[4] प्रस्तुत अध्ययनात 61.0% उत्तरदाते लैंगिक संबंध लग्नानंतरचीच बाब आहे असे म्हणत असले तरी 25.7% उत्तरदाते लैंगिक संबध लग्नानंतरची बाब आहे या मताशी सहमत नाही. वास्तविक सुदृढ लैंगिकता**

**दोघात प्रेम, आदर, स्नेह, समजूतदारपणा निर्माण करते. “1930 च्या काळात झालेल्या काही पाहण्यावरून असे निदशर्नास आले की, विवाहापूर्वी समागमाचा अनुभव घेतलेल्या स्त्रियांचं प्रमाण शंभर टक्के असल्याचे लक्षात आले.** जॅ**फेपेरेट या इतिहासकाराने या स्थितीबद्दल म्हटले की, लैंगिक स्वातंत्र्य हे लोकांना शास्त्रीय व तर्कसंगत वाटू लागले. यामुळे व्यक्तिमत्वाचे विघटन सुद्धा होवू शकते असा इशारा फ्राईडने दिला आहे.”** [5] **संतती नियमनाचे एखादे साधन वापरले तर गर्भधारणेची भिती राहत नाही असे जरी तरुणांना वाटत असले तरी इतर समस्या त्यातून उद्‌भवू शकतात. जसे** HIV, **गुप्तरोग होऊ शकतो इ. अलिकडे झालेल्या एका संशोधनातून असे निदर्शनास आले की, “60** percent of the 20-24 years old reported that they knew some friend if theirs was involved in premarital set and 25 indulged in non-coital sex.” [6] (Chauhan S.L.) **प्रस्तुत अध्ययनात विवाहपूर्व लैंगिक संबंध स्थापन करणे हे आधुनिकतेचे लक्षण आहे असे 39.3% उत्तरदाते म्हणतात. यामध्ये** विद्यार्थिनी **उत्तरदात्यांपेक्षा** विद्यार्थी **उत्तरदात्यांचे प्रमाण (57.4%) अधिक आहे. यामुळे आधुनिकीकरणाचे परिणामी लैंगिक संबंधाच्या बाबतीत सैल विचार करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. भारतात** HIV/AIDS **चा प्रसार** झपाट्याने **होण्याची जी कारणे आहेत त्यामध्ये असुरक्षित लैंगिक संबंध हे प्रमुख कारण आहे. एकदा** ह्या **आजाराची लागण झाली की, आयुष्यभर यातून सुटका नाही. अध्ययनातून स्पष्ट झाले की, “**Adolescents are indulging in premarital sex more frequently at an early age the incidence of pregnancies among them is rising and most of them face the risk of induced abortions under unsafe conditions, and contracting sexually transmitted infection including HIV.”[7] (Chauhan’ S.L) **अध्ययनात** HIV/AIDS **च्या प्रसारावर आळा घालणे उत्तम उपाय असल्याचे** 60.9**% उत्तरदाते मान्य करतात.**

महाविद्यालयात **शिकत असणारे** विद्यार्थी **भावी जीवनाची सुरुवात करत असतात. त्यामुळे** ह्या **अवस्थेतील** विद्यार्थ्यांना **इतर सर्वसामान्य विषयांच्या ज्ञानाबरोबर लैंगिक जीवनाशी संबंधित गर्भनिरोधक व** S.T.D **रोगासंबंधीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. याच वयात त्यांना नवीन नाती-गोती निर्माण करण्याची आवश्यकता वाटते. मुले आपल्या भावना व्यक्त करणे, प्रेम करणे तसेच इतरांकडून प्रेम मिळविण्याची, इतरांशी जवळीक निर्माण करण्याची तसेच लैंगिक क्षमता विकसित करण्याची पात्रता आली असते. त्यामुळे त्यांना** S.T.D.,HIV**.,** **AIDS**, **गुप्तरोग या संबंधीचे परिपूर्ण ज्ञान असायला पाहिजे. एका सर्वेक्षणानुसार भारतातील पौगंडावस्थेतील युवकांना यासंबंधी किती ज्ञान आहे? तर असे आढळून आले कि, “**India starts sex education for children little after 15 years, though in western countries it starts from 12 onwards. This could be one of the reasons why Indians had little knowledge of how to avoid permanency. India’s scored more 70 parents.”[8] (www.indiaedunews.net) **प्रस्तुत अध्ययनात** 77.7**% उत्तरदात्यांनी गर्भनिरोधक व** S.T.D. **रोगासंबंधी परिपूर्ण ज्ञान नाही असे म्हटले आहे. देशाच्या सर्व भागात** HIV/AIDS **पिडीतांचे प्रमाण सतत वाढत आहे. “**HIV **विषाणूचा संसर्ग संभोग, दूषित रक्त व रक्त घट**काद्वारे, HIV **बाधित आईपासून होणाऱ्या मुलास, गर्भावस्थेत किंवा प्रसुतीच्या वेळी** ह्या **तीन मार्गाने होतो. असे असले तरी संभोगातून** HIV/AIDS **व गुप्त रोग होणाऱ्या तरुणांची संख्या सर्वाधिक आहे.”**[9] **प्रस्तुत अध्ययनात अनोळखी व्यक्तीशी शारीरिक संबंध टाळणे हा** HIV **व गुप्त रोगाचा समाजात प्रसार रोखण्याचा एक खात्रीचा मार्ग असे 66.0% उत्तरदाते मान्य करतात. एच.आय.व्ही. बाधित व्यक्तीला पूर्णपणे एड्सची लागण होण्यास अनेक वर्षे लागतात.** HIV **बाधित व्यक्ती इतर सर्व सामान्य व्यक्ती सारखीच दिसते. 1 ते 10**

**वर्ष** ह्या **मधल्या काळात एच., आय., व्ही. बाधित व्यक्ती सर्वसामान्य आयुष्य जगू शकते. त्यामुळे कोणती व्यक्ती एच. आय. व्ही. व गुप्तरोग पीडित आहे हे बा**ह्य **लक्षणावरून ओळखता येत नाही. त्यामुळे अनोळखी व्यक्तींशी शारीरिक संबंध टाळणे हाच उत्तम उपाय आहे. मात्र 34.0% उत्तरदात्यांना यासंबंधी निश्चित सांगता येत नाही असे अध्ययनात दिसून आले आहे. लैंगिक संबंधातून आणि त्यातही असुरक्षित लैगिक संबंधातून एच. आय. व्ही. चा प्रसार होतो. मित्रांच्या माध्यमाने मिळणारे ज्ञान हे अपूर्ण व संशयास्पद असते. सुरक्षित यौन संबंधाविषयी योग्य माहिती तरुणांना मिळत नाही व कोणते** S.T.D. **होऊ शकतात, याची त्यांना जाणीव नसते. त्यामुळे युवकांनी एक तर लैंगिक संबंधात गुंतू नये. शिवाय असुरक्षित लैंगिक संबंध टाळावे डॉ. राजन भोसले यांचे मते "सुरक्षित लैंगिक संबंधातूनही (निरोधचा वापर करून स्थापन केलेले) एच. आय. व्ही. ची लागण होऊ शकते."**[10] **त्यामुळे असुरक्षित लैंगिक संबंधातून एच. आय. व्ही. चा प्रसार होणारच. अध्ययनात 70.0% उत्तरदाते असुरक्षित लैंगिक संबंधा**द्वारे **H.I.V. चा प्रसार स्वस्थ समाजामध्ये** झपाट्याने **होत असतो या विधानाशी सहमत आहे. मात्र** 30.0**% उत्तरदाते या विधानाशी सहमत नाहीत किंवा सांगता येत नाही असे म्हणतात. परंतु औपचारिक लैंगिक शिक्षणाला समाजाच्या सर्व थरातून विरोध होतांना दिसतो आहे. 2008 साली महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण मंत्र्याने लैंगिक शिक्षणाला मान्यता देण्याचा प्रस्ताव विधिमंडळात ठेवला असता सगळ्याच पक्षातील नेत्यांनी** ह्या **प्रस्तावाला विरोध केला. पालक शिक्षक आणि इतर मंडळी सुद्धा** ह्या**त सहभागी आहेत. त्यांचे मत आहे की मुलांना औपचारिक शिक्षणातून लैंगिक शिक्षण दिल्यास मुले बहकतील ही त्यांची भिती निराधार आहे.** ***डॉ. विठ्ठल प्रभू*** **यांचे मते "कामजीवन विषयक शिक्षण दिल्यास युवक उचित वयापुर्वीच कामजीवन उपभोगण्यास उत्सुक होतील हा समज चुकीचा आहे. योग्य माहीती दिल्यास युवक जागरूकपणे वागतात असे अनेक पाहणीत आढळून आले आहे."**[11] **ज्या मुलांना हे शिक्षण** द्या**यचे आहे त्या संदर्भात त्यांची काय मते आहेत, हे जाणून घेण्याचा फारसा प्रयत्न होतांना दिसत नाही. प्रस्तुत अध्ययनात औपचारिक लैंगिक शिक्षणाला मान्यता दिल्याने** महाविद्याल**यीन युवकांमध्ये लैंगिक संबंधात वाढ होत नाही असे 59.3% उत्तरदाते म्हणतात. शिवाय लैंगिक शिक्षण हे लसीप्रमाणे प्रतिबंधक स्वरूपाचे आहे. कारण लैंगिक शिक्षणामुळे मुलामुलींना स्वतच्या लैंगिकतेविषयी जाण येते. संभाव्य धोके कोणते, स्वतःची काळजी का व कशी घ्यायची याची माहिती मिळते. योग्यवेळी योग्य तो निर्णय घेण्याची क्षमता येते. भावनात्मक प्रवृत्तीचे जतन होते. अनेक संशोधनातून हे सिध्द झाले आहे की, "S**ex education provides accurate information about human growth and development, human reproduction, anatomy, physiology, masturbation, family life, pregnancy, childbirth, parenthood, sexual response, sexual orientation, contraception, abortion, sexual abuse, HIV/AIDS and other sexually transmitted diseases."[12] (Haffner D. W.)**लैंगिक शिक्षणाचा समावेश शाळा-**महाविद्यालयीन **अभ्यासक्रमात केल्याने गुप्तरोग व एड्स सारख्या रोगावर आळा बसतो असे 84.3% उत्तरदात्यांना वाटते. औपचारिक शिक्षणावरील अभ्यासक्रमातून जवळपास सर्वच विषय** विद्यार्थ्यांना **शिकविले जातात. मात्र लैंगिक शिक्षणाचाच तेवढा या अभ्यासक्रमात समावेश नाही. कारण लैंगिक शिक्षणाबद्दल अनेकांच्या मनात अनेक प्रश्न, शंका आहेत. परंतु हे प्रश्न, शंका अज्ञानातून निर्माण झाले आहेत. हे प्रश्न, शंका सोडविण्याच्या संदर्भात शाळा-महावि**द्याल**य महत्वाची भूमिका वठवू शकते. युनेस्कोच्या एका अहवालात म्हटले आहे की, "**The initiative of the school in the strengthening of family education can be effective only if the school understands its own role correctly. It never stands in

isolation, on a world made for it, but rather has to take into account the fundamental requirements of two parties, namely, the child itself and society. It is the middleman between the starting point and the goal, and can therefore never be an end in itself."

**अहवालात पुढे म्हटले आहे की, "F**or every child such teaching and training as will prepare him for successful parenthood, home-making, and the rights of citizenship; and for parents, supplementary training to fit them to deal wisely with the problems of parenthood." [13] **या संदर्भात लैंगिक शिक्षण सामाजिक स्वास्थासाठी आवश्यक व परवडण्यासारखे आहे असे अध्ययनातील 77.3% उत्तरदात्यांनी आपले मत नोंदवले आहे. या मध्ये विद्यार्थिनी उत्तरदात्यांचे प्रमाण 80.1% आहे. लैंगिक शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ माहिती पुरविणे हे नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला, मानसिकतेला पुरुषाची लैंगिक्ता, लैंगिक आरोग्य,** STD, HIV, AIDS, **गुप्तरोग, युवावस्थेची मानसिकता, पौगंडावस्थेतील युवक-युतींच्या समस्या, मानसिक तणाव, पौगंडावस्थेतील आजार व दोष, लैंगिकतेविषयी समज-गैरसमज, लैंगिक आकर्षण, स्त्री-पुरूषांची जननेंद्रिये, रचना व कार्य, स्त्री-पुरुष भेद हे आहेत. हे असे विषय आहेत की, जे संपूर्ण जीवनाशी संबधित असून यांचा परिणाम सामाजिक जीवनाच्या विविध घटकांवर होतो. मात्र या विषयाचे ज्ञान औपचारिक शिक्षणातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सुद्धा दिले जात नाही. शास्त्रीय अर्थाने लैंगिक शिक्षण म्हणजे** "Comprehensive sexuality education addresses the biological, socio-cultural, psychological, and spiritual dimensions of sexuality."[14] (Heffner D.W.) **व्यापक अर्थाने** "A range of sexuality education strategies are used with the aim of reducing HIV infection rates among young people, including raising knowledge and awareness, influencing attitudes and behaviors, and promoting the utilization of preventive services through mass media, person to person communication and service providers." [15](Chi-Chi Undies, Joanna Crichton) **प्रस्तुत अध्ययनात औपचारिक लैंगिक शिक्षण म्हणजे खऱ्या अर्थाने 'जीवन शिक्षण' होय असे** 88.8% **उत्तरदात्यांनी म्हटले आहे. 'लैंगिकता' हा विषय असा आहे की, ज्याचे योग्य ज्ञान पौगंडावस्थेतील युवकांना नसल्यामुळे ते गोंधळलेल्या अवस्थेत भविष्याला सामोरे जात आहे. या विषयाचे ज्ञान त्यांना पालक व शिक्षकांकडून दिले जात नाही.** "The responses clearly indicated that both parents and teachers were ill-equipped to answer sex-related queries and that there was an acute need for proper sex education at the school level"**[16]** (Anagha Sawant) **त्यामुळे** महाविद्यालयीन **युवकांना औपचारिक लैंगिक शिक्षणाची आवश्यकता वाटते काय? "**The ultimate goal of sex education should be the positive perception of individual sexuality." **[17]** (Walsh E. Meredith) **अध्ययनात 95.3% उत्तरदात्यांनी** महाविद्यालयीन **युवकांना औपचारिक लैंगिक शिक्षण देणे योग्य आहे असे म्हंटले आहे. यामध्ये वाणिज्य शाखेतील** 100.0**% उत्तरदात्यांनी** महाविद्यालयीन **युवकांना औपचारिक लैंगिक शिक्षण देणे योग्य आहे असे म्हटले आहे.**

## निष्कर्ष :

1) **पाश्चिमात्यीकारण व आधुनिकीकारणाचा वाढता प्रभाव असतांना सुद्धा विवाहपूर्व लैंगिक संबंध ही चुकीची गोष्ट आहे याची जाणीव बहुसंख्य उत्तरदात्यांना आहे. शिवाय एच. आय. व्ही. एड्सच्या प्रसारावर आळा घालणे आवश्यक आहे.**

2) **बहुसंख्य** 253(74.3**%) उत्तरदात्यांच्या मते, लैंगिक शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात केल्याने गुप्तरोग व एड्स यासारख्या रोगावर आळा बसेल.**

3) **लैंगिक शिक्षणाला मान्यता दिल्याने** महाविद्यालयीन **युवकांमध्ये लैंगिक संबंधात वाढ होत नाही.**

4) **याचबरोबर इतर विषयाच्या ज्ञानाबरोबरच लैंगिक शिक्षणावरील ज्ञान उत्तरदात्यांना देणे सामाजिक स्वास्थ्यासाठी गरजेचे असून लैंगिक शिक्षण म्हणजे 'जीवन शिक्षण' होय. त्यामुळे** महाविद्यालयीन **युवकांना औपचारिक लैंगिक शिक्षण देणे योग्य राहील.**

## उपाययोजना :

**1**) **शिक्षणही सामाजिक प्रक्रिया असल्यामुळे** महाविद्याल**यात लैंगिक शिक्षण देण्याची सुरुवात टप्प्याटप्प्याने करण्यात यावी.**

2) **मुलांना आणि मुलींनाऔपचारिक लैंगिक शिक्षण एकत्र** द्या**यचे की वेगवेगळे याचाही शास्त्रीय** दृष्टिकोणातून **विचार करण्यात यावा.**

3) **एच. आय. व्ही. एड्स यासारख्या भयावह परिस्थितीला आळा घालण्यासाठी त्या विषयाशी संबंधित तज्ज्ञाशी विचार विमर्श करून सरकारने धोरण निर्धारित केल्यास येणाऱ्या संभाव्य अडचणी वर मात करता येईल.**

4) **अध्ययनातील** 100**% उत्तरदाते औपचारिक लैंगिक शिक्षण घेण्यास उत्सूक आहेत. जर असे झाले तर युवकांच्या शारीरिक, मानसिक बौद्धिक सुदृढ व्यक्तिमत्त्व विकासासाठी निश्चितच हातभार लागेल.**

## संदर्भ ग्रंथसूची :

1) **जोशी, तर्कतीर्थ श्री.** लक्ष्मणशास्त्री **मराठी विश्वकोष खंड -२ महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई -२००० पृ.पृ. ५५ ते ५६**

2) **जोशी, तर्कतीर्थ श्री.** लक्ष्मणशास्त्री**: कित्ता पृ. ५७**

3**)** SAWANT ANAGHA Youth confused about sex-survey: FPAI (family Planning Association of India) www.indianexpress.com

4) **क्षिरसागर**, **श्रीकृष्ण के. लैंगिक नीती व समाज, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २००३ पृ. ८५**

5**) लिंबाळे शरणकुमार विवाहबाह्य संबंध नवीन** दृष्टिकोन**, दिलीपराज प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे २००६, पृ. ६३**

6**)** CHAUHAN S.L. & JOSHI BEENA Adolescent Reproductive Health, Mumbai 2005-08 P.173 www.medind.nic.in.

7) CHAUHAN S.L. & BEENA: **Ib**id p. 171

8) Global survey to explore effectiveness of sex education June, 29, 2008 www.indiaedunews.net

9) **डॉ.कुलकर्णी व्ही.एल.**, **श्रीमती मोरे संगीता, डॉ. महाजन ललीता एड्स प्रतिबंध शिक्षण महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुबई. १९९५ पृ. २०**

10**) डॉ. भोसले, राजन समग्र कामजीवन, मनोविकास प्रकाशन चर्चगेट, मुंबई २००३ पृ. १४१**

11**) डॉ. प्रभू, विठ्ठल यौवन ते विवाह (विवाहपूर्व मार्गदर्शन व लैंगिक्ता शिक्षण), ॅजेस्टिक प्रकाशन, मुबई. २००५ पृ. १**

12) HAFFNER, D.W.Sex education 2000: A call to action. New York: Sex information and education council of the U.S. 1990 P. 4

13) ELIZABETH S. FORCE “School and Social Maladjustment of Youth.”`UNESCO Report, A Conference 17, June 11, 1960 www.links. Jstor.org.

14) HAFFNER, D.W.: op. cit. p.28

15) CHI-CHI UNDIE, JOANNA CRICHTON Metaphors We Love By: Conceptualization of sex among young people in Malawi. www.pubmedcentral. nih.gov

16) ANAGHA SAWANT: Op.cit.p4

17) WALSH E. MEREDITH Sex education for students with vision Impairments a Guide for visiting teacher.www. SVRC.vic.edu.au